# ल्यारल्या प्रेमाची

ऋषिकेश मोरे

# मनोगत

मला कविता करण्याचा नाद अगर छंद म्हणा पहिल्या पासूनच होता. वाचनाची आवड ही खूप होती. आवडलेले शब्द मी नेहमी वेचीत असे आणि मनातल्या गाभाऱ्यात साठवून ठेवीत असे. सुंदर शब्दरचना मला फार आवडतात. मी मुंबईत एका नामांकित कंपनीत ग्राफिक डिजायनर म्हणून कार्यरत आहे.

शब्दाचा छंद हा पहिल्यापासूनच होता पण तो कधी कागदावर आखण्याची हिम्मतच झाली नाही. असेच एकदा आम्ही सर्व मित्र भेटलो होतो; माझे एक मित्र आहेत ते फार छान कविता करतात, त्यांनी त्यांची एक कविता ऐकवून दाखवली. त्यांची कल्पना जिथे संपत होती तिथे माझी संकल्पना सुरु झाली मी त्यांना माझ्या काही चारोळ्या ऐकवून दाखवल्या, त्यावर ते म्हणाले इतके छान बोलतोस, कधी लिहिण्याचा प्रयत्न केला आहेस का? मी नाही म्हणताच तो म्हणाला मग लिहून बघ! मी हिम्मत करून तो प्रयत्न करून पाहिला आणि त्या प्रयत्नांनी आज तुमच्या पुढे हा कविता संग्रह आला आहे.

काव्य हे उपजत अगर उत्स्फुर्त असते. फक्त त्याला सुक्ष्म निरीक्षण व संवेदनशील मन हवे असे मला वाटते.

मला जे उत्स्फूर्त स्फुरले ते कागदावर टिपले आहे. माझ्या कवितेची साज जरी थोडी वेगळी असली तरी आपल्यासारख्या काव्य रसिकांनी त्यातील अर्थ तो शब्दांचा घ्यावा या उक्तीप्रमाणे होऊन मी माझ्या काव्य संग्रहाला दाद देतील अशी अपेक्षा बाळगतो.



क्रषिकेश मोरे

प्रकाशक आणि वितरक:

मोबाइल: (९८६९६७४८२०)

वेबसाइट: www.esahity.com

सर्व हक्क कवीकडे: ऋषिकेश मोरे

मुखपृष्ठ व अंतरंग : ऋषिकेश मोरे

बि-१५ वल्लभ अपार्टमेंट, लिंक रोड,गोरेगाव (प) मुंबई ४००१०४

मोबाइल: (९८९२७७६१६२)

ई-मेल: rishikesh.more@gmail.com

मुद्रक: ओम प्रिंटर्स

पहिली आवृत्ती: १ सप्टेंबर २०११(गणेश चतुर्थी)

हा संग्रह माझ्या आईस सप्रेम भेट

# माय

माय वर काय बोलू मी
माझी माय जगाहून प्यारी
सर्वांहून न्यारी
सात जन्म झाले तरी
नाही ऋण फेडू
शकणार तीचे,
तिच्या चरणी
माझे सारे विश्व
बालपणी मुखी पहिला शब्द
येतो तो माय,
तिचे ते कष्ट
तिने केलेल्या त्या
सर्वस्वाचा त्याग माझ्यासाठी
नाही विसरू शकणार मी कधी
वडील नसताना कधी त्यांची उणीव
भासू नाही दिली तिने
तिच्या समोर मी कधी मोकळ्याने
बोलूच शकलो नाही
पण ती माझा चेहरा बघताच
समजून जाई की काय
सांगायचे आहे मला
अशी माझी माय.



# कुणीतरी असं असावं

आयुष्याच्या त्या क्षणावरती
होतो मी एकटा
जसा निवडुंग वाळूत
वाट पाहत असतो पाण्याची
आयुष्यात कुणीतरी असा असावा
ज्याला आपलं म्हणावं असं
जिच्यासाठी काहीही हसत हसत
करून जाता यावं
सुख असो किंवा दु:ख
तिच्या सुखात तिला
खूप आनंद द्यावा
तिला ठेच लागताच
माझ्या डोळ्यात अश्रू यावे
कुणीतरी असं असावं
मी बोलण्याच्या आधी कळावं तीला
मला काय हवं आहे
कुणीतरी असं असावं
जिच्या कुशीत जावून खूप रडावं
आपलं मन मोकळं करावं
कुणीतरी असं असावं
तिच्या खांद्यावरती डोकं ठेवून
सारं जग विसरावं
कुणीतरी असं असावं
अनित्य निरंतर प्रेम करणारं आपल्यावर



# सर पहिल्या प्रेमाची

पहिली सर
ते कॉलेजचे दिवस
ती माझ्या क्लासमध्येच होती
आम्ही दोघे एकमेकांना
तिन वर्षापासून ओळखत होतो
पण प्रेम व्यक्त करण्याची कधी
हिम्मतच झाली नाही
त्या दिवशी खूप पाऊस होता
आम्ही कॉलेज बंक करून पावसात
भिजायचं ठरवलं
आमच्याकडे छत्र्या ही होत्या
तरी त्यांचा वापर कोणीही केला नाही
कारण सर्वांना पहिल्या सरीचा
आनंद घ्यायचा होता
तिच्या सोबत भिजताना तो
आनंदच निराळा होता
पावसाचा एक एक थेंब दव-बिंदू सारखा
तिच्या गोऱ्यागाला वरून खाली
निसटताना खूप सुरेख वाटत होता
जणू मेघराजा ही तिच्या प्रेमातच पडला होता
कारण आहेच मुळी ती तशी
अचानक काय झालं नाही कळलं नाही
भिजता भिजता तिने अचानक मला
घट्ट मिठी मारली
कारण विज कडकडल्याने
ती खूप घाबरली होती
त्या मिठीचा तो गोड सहवास
अविस्मरणीय होता माझ्यासाठी
तिच्या गालावरचे दव बिंदू
निसटताना मी जवळून पाहत होतो
ती डोळे मिटून
घट्ट मिठीत उभी होती
अचानक तिच्या तोंडून
शब्द आले
आय लव्ह यू....!
मी म्हटलं काय?
ती म्हणाली देशील का
आयुष्यभर साथ मला?
क्षणभर मला काहीच कळेना
मी हो म्हणालो
माझ्या तोंडून हो ऐकताच
तिचा आनंद गगनात
मावेनासा झाला
जणू मेघ राजानी
तो दव बिंदू मला आयुष्यभर
जपून ठेवण्यासाठी दिला होता



# असा माझा मित्र

असा माझा मित्र काय
नाव देऊ ह्या नात्याला
मित्र की भाऊ किंबहुना
त्याहून जास्ती
काहीच कळेना मला?
होती काही दिवसांची मैत्री
पण खूप काही देऊन गेला तो मला
प्रत्येक क्षणोक्षणी तो माझ्या
मागे उभा रहायचा
सुख असो वा दु:ख
कधीच त्यांनी माझी
साथ सोडली नाही
ओठांवर काही शब्द येण्यापूर्वीच
तो समजून जाई
मला काय सांगायचे आहे
पण का मला त्याच्या सारखं कधी
समजून घेता आलं नाही
नेहमी हा प्रश्न मी
स्वत:ला विचारतो
जसा आकाशातून
धुमकेतू बघता-बघता
कधी निघून जातो तसा
तो कधी निघून गेला
त्याचे काही कळलेच नाही

त्याची कधी एक झलक
जरी दिसली तरी
माझ्या आठवणीचा समुद्र
माझ्या डोळ्यात दाटून येतो
वेड्या मनाला अजूनही वाटत
कधीतरी समजेल
तो माझ्या मैत्रीला
सगळे गैरसमज दूर करून
पुन्हा आम्ही छान मित्र होऊ
होईल का असं?




# परतीच्या वाटेवरती

परतीच्या वाटेवरती होतो मी
नजर लावूनी वाट तुझी पाहत
तू कधीतरी येशील या आशेने
पण माझ्या वेड्या
मनाला कोण सांगणार?
की तू आता वाटच
बदलली आहेस त्या परतीची
वेडं मन रोज डोळ्यात अश्रू
घेऊन त्या वाटेकडे
नजर लावून बसलेलं असतं
जसा चातक पावसाची वाट
पाहत असतो
जराशी झुळूक लागली तरी
तुझाच भास होतो
का कुणास ठाऊक
त्या वाटेवरून
नजरच हलत नाही माझी
कधीतरी येशील त्या वाटेवरती
जसा चातक वाट पाहतोय
पावसाची तशीच बघतोय
मी तुझी.....



# चांगला मित्र

होती आमची ओळख बालपणाची
तिला चिडविल्याशिवाय
माझा दिवस पुढे सरकत नसे
ति रागावल्यावर
तीचे लाल गाल जणू
सरफचंदच झाले होते
तिच्याशिवाय लहानपणी
एक क्षण ही जायचा नाही
तिचा राग मात्र नेहमी
तिच्या नाकावर असायचा
ति मला स्वत:चा
चांगला मित्र मानायची
का कोणास ठाऊक ती
आपल्या सगळ्या गोष्टी
शेअर करायची
का कोणास ठाऊक मी
तीची खूप काळजी
घ्यायला लागलो होतो
का माहीत नाही
एका चांगल्या मित्रापेक्षा ही जास्त
कदाचित माझ्या मैत्रीचे रुपांतर
आता प्रेमात झालं होतं
पण कधी बोलाची हिम्मत झाली नाही
पण एकदा मी मस्करी
मध्ये तिला विचारलेच
त्यावर ती म्हणाली माझ्यात काय आहे रे
तू इतका सुंदर आहेस ना
तुला काय ऐश्वर्या ही पसंत करेल
पण मी मनात म्हटलं
तुझी सर तिला कधी येणार नाही
एक दिवस असेच आम्ही
समुद्रकिनारी फिरायला गेलो होतो
वाळूत बसून आम्ही
गप्पा-गोष्टी करत होतो
मी मनामध्ये ठाम निर्णयच केला होता
की तिच्या समोर आपलं
मन मोकळं करायचं
ति रागावली तरी समझावेन मी तिला
आमच्या इथल्या-तिथल्या
गप्पा-गोष्टी रंगल्या होत्या
अचानक तिच्या तोंडून शब्द आले
तो खूप आवडतो रे मला
खूप प्रेम करते मी त्याच्यावर
नाही राहू शकणार
मी त्याच्याशिवाय
तिच्या तोंडून हे शब्द ऐकताच
मी स्तब्ध झालो
माझ्या हातून वाळूचे कण
निसटून चालले होते
पण मी काहीच करू शकत नव्हतो
कारण मी तिचा फक्त एक चांगला मित्र
म्हणून राहिलो होतो



# क्षण

आठवतात ते क्षण अजूनही मला
तुझ्या बरोबरचा तो प्रत्येक क्षण
तो समुद्र किनारा, ते समुद्राचे पाणी
तुझ्या पावलांना जेव्हा ते स्पर्श करून जाई
तेव्हा तुझे ते गोड हसणे
आठवते अजूनही मला
तो हातात धरलेला तुझा नाजूक हात,
त्या हाताचा तो स्पर्श
खूप काही देऊन जाई मला
आठवते अजूनही मला
तू पाठीवरून फिरवलेला तो मायेचा हात
आठवते अजूनही मला
ते हॉस्पिटल तो आय.सी.यू.चा वॉर्ड
आणि तो बेड नं ७
आठवते अजूनही मला
आठवतोय तु घेतलेला तो शेवटचा श्वास
आणि तुझे ते शेवटचे शब्द जानू
जगायचे रे मला तुझ्यासोबत सुंदर आयुष्य
आठवतात ते तुझ्या बरोबरचे
क्षण अन् क्षण अजूनही मला
नाही विसरू शकणार मी कधी.................



# गोडवा

साखरेहुनी गोड
किंबहुना त्याहूनी गोड
असा हा गोडवा आहे प्रेमाचा
जग कसं सुंदर वाटू लागतं
जणू आपण काही हवेतच उडतो
आहोत असं जाणवू लागतो
आपल्या बॉसची
रोजची कट-कट
सुद्धा गोड वाटू लागते.
जगायचा आपला
दृष्टीकोनच बदलून जातो
जी गोष्ट आवडत नसते त्या
गोष्टीत खूप रस यायला
लागलेला असतो
प्रत्येक गोष्टीवर आपण प्रेम
करायला लागलेलो असतो
आपण सर्वांना फक्त प्रेम देणे
हिच भावना आलेली असते
एका व्यक्तीच्या येण्याने
आपलं आयुष्य कसं
इतकं बदलून गेलं असतं
आयुष्याला एक नवीन असा
गोडवा आलेला असतो
जशी अळी आपल्या कोशावरती
खूप प्रेम करते असंच आपणही
सर्वांवर खूप प्रेम करायला लागलेलो असतो
हा गोडवा असतो प्रेमाचा.....



# कळेल का कधी तिला...

माझी ओळख फक्त काही दिवसांपूर्वीच
झाली होती तिच्याशी
हळूहळू आम्ही एकमेकांच्यां जवळ येत
गेलो खूप छान मैत्री झाली आमची
नेहमी सोबत असतो
खूप गप्पा गोष्टी रंगायच्या आमच्यात
पण मी तिच्या सोबत प्रेमाच्या गोष्टी
कधी केल्याच नाहीत
का कुणाक ठाऊक?
खूप भीती वाटायची
का मी तिच्या एका हाकेला
काहीही विचार न करता तीला भेटायला
पळत सुटतो काहीच कळत नाही?
खरंच ही फक्त मैत्रीच आहे का?
जेव्हा मी ऑफीसमधून
घरी जाण्यास निघतो
तेव्हा मी ती कधी निघणार
याची वाट पाहत बसतो
का कुणाक ठाऊक
तीला एकटे सोडायला
घाबरतो मी म्हणून
स्वत: बस स्टॉप पर्यंत मी
तिला सोडायला जातो
अशी काळजी तर दुसरे मित्र मैत्रीणी
सुद्धा करतात ना.....
जेव्हा ती दूर जाताच
मी तिला विचारतो तू
व्यवस्थित पोहोचलीस ना॥
तिची भेट जरी रोज होत असली
तरी विचार मात्र मी तिचाच
नेहमी करत असतो
का मी तीला खरं सांगू शकत नाही
की मी खरंच तुझ्यावर खूप प्रेम करतो
कळेल का कधी तिला
तिच्या बरोबरचा एक एक क्षण
अविस्मरणीय वाटतो मला
कधी मी तिला एखाद्या मुली बद्दल
सांगितल्यावर ती इग्नोर करते
मी मध्येच कधी कोणत्या मुलाबद्दल
विचारल्यावर ती विषयच बदलून टाकते
का... ती तिच्या भावना
अशा लपवून ठेवते माझ्यापासून ?
असं वाटतं संपूर्ण आयुष्यभर तीच्या
मिठीत रहावं
तिच्या सोबत घालवलेला प्रत्येक
क्षण खूप गोड वाटतो मला
समजेल का कधी ती माझ्या
भावना? का मी घाबरतो प्रेम
व्यक्त करायला तिच्या समोर
माझं प्रेम व्यक्त केल्याने आमच्या
मैत्रीच्या नात्यात काही दुरावा
तर नाही ना येणार..........?



# रंग

रंग तर खूप असतात
निरनिराळ्या प्रकारचे
लाल, हिरवा, निळा, पिवळा
पण मला नक्की
कुठला रंग चढलाय?
कदाचित हा रंग आहे प्रेमाचा
ती रंगाना खूप घाबरायची,
कारण कुठल्या
रंगांनी तिची त्वचा खराब झाली तर
कारण ती होतीच मुळी तशी ती
मी आज ठाम
निर्णयच केला होता की
आज तिला माझ्या
प्रेमाचा रंग लावायचाच
आम्ही सगळे मित्र-मैत्रिणी
तीच्या घरी तीला
रंग लावण्यास गेलो होतो
सगळे जण हाक मारून
तिला घराबाहेर बोलावण्याचा
प्रयत्न करत होते पण ती काही बाहेर येईना
मित्र म्हणाला तू हाक मारून पहा
कदाचित ती येईल॥
मी तिला हाक मारताच तिने पहिल्याच
हाकेला बाहेर येण्यास होकार दिला

ति म्हणाली मला
कुणी गडद रंग
नाही ना लावणार...?
तीच्या त्या घाबरण्याला
मी समजू शकत होतो
ती बाहेर येताच सर्वांपासून
मी तिला सावरले आणि
कुणालाही तिला
रंग लावू दिला नाही
अचानक ती म्हणाली
मला रंग नाही का लावणार?
मी घाबरलो
मी माझ्या हातातला गुलाल
तिच्या गोऱ्या गालांना लावला
जणू गुलाबाची नाजूक
कळी खुलली आहे
असं वाटत होतं
मी श्वास घट्ट करून
तीला विचारलं
माझ्या प्रेमाच्या रंगात
रंगशील का आयुष्यभर ?
तिच्या त्या गोड लाजून
हसण्यात मला
खूप काही मिळून गेलं होतं

ई साहित्य प्रतिष्ठानच्या

या पुर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी भेट द्या

www.esahity.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

## आजवरची ईपुस्तके

ओथंब,

मोरया,

चार क्षण,

सईची वही

लोकल गोष्टी

प्रियेचे अभंग

तो आणि ती,

टल्लीची शाळा

अहम् ब्रह्मास्मि

ब्रेव्हयार्ड लिटरेचर

मकरंदच्या त्रिवेण्या

मीरा (मराठी अनुवाद)

सावळ्या मुलीची गाणी,

देशी दारूचे दुकान (3D),

मराठी कसे लिहावे(ई शाळा),

तो , मी आणि सिगारेट

ओथंब २

## नियतकालिके

ई साप्ताहिक नेटाक्षरी

स्वरनेटाक्षरी अल्बम्स

ईस्टाप ( मराठी विनोद/ विडंबन)

बालनेटाक्षरी

## दुर्ग दुर्गट भारी :

किल्ले रायगड

पेबचा किल्ला

पावनखिंड विशेष